ಕರ್ನಾಟಕ ಸರ್ಕಾರ

ಶಾಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ಸಾಕ್ಷರತಾ ಇಲಾಖೆ

ಪಠ್ಯಕ್ರಮ ಆಧಾರಿತ ಮೌಲ್ಯಮಾಪನ ಸಾಮಗ್ರಿ

2025–26

ವಿಷಯ : ಮಾಯ ಮರಾಠಿ

विषय : माय मराठी

CLASS : 3



ರಾಜ್ಯ ಶೈಕ್ಷಣಿಕ ಸಂಶೋಧನೆ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ,

ಬನಶಂಕರಿ 3 ನೇ ಹಂತ, ಬೆಂಗಳೂರು – 560085

ಜಿಲ್ಲಾ ಶಿಕ್ಷಣ ಮತ್ತು ತರಬೇತಿ ಸಂಸ್ಥೆ, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

Concept and Guidance

Smt Rashmi Mahesh V. IAS Principal Secretary to Government Department of School Education and Literacy	
Dr. Trilokchandra K.V IAS Commissioner Department of School Education, Bangalore	**Shri. Gopalakrishna H.N** Director, DSERT Bangalore

DIET Co-operation

Shri. Sanjeev Hulloli Principal DIET Chikkodi	Dr. K B Talawar Lecturer DIET Chikkodi

Composition

Smt. Radha P.
Senior Assistant Director
DSERT Bangalore

Mentor & Examiner

Shri. D. H. Kamble
Govt M. H. P.S. Rampur
Tal. Dist : Chikkodi

LESSON BASED ASSESSMENT MATERIAL CREATION RESOURCE TEAM OF 3 RD MARATHI

Smt. U. G. MOHITE. Govt MHPS Hadalaga Tal : Hukkari Dist : Chikkodi
Shri. R. B. MADHALE. Govt MHPS Solapur Tal : Hukkari Dist : Chikkodi
Smt. M. S. SHEVALE. Govt MHPS Haragapurgad Tal : Hukkari Dist : Chikkodi
Shri. C. A. Kumbhar. Govt MLPS Sunnadkodi Tal: Athani Dist : Chikkodi

✸अनुक्रमणिका✸

BLUE PRINT निल नकाशा भाग 2

घटक	ज्ञान			आकलन			उपयोजन			कौशल्य			एकूण	
	O.T.	S. A.	L. A.	O.T.	S. A.	L. A.	O.T.	S. A.	L. A.	O.T.	S. A.	L. A.	T. Q.	T. M.
1	10(1)	8(2)		10(1)	5(2)	2(4)	10(1)	5(2)	2(4)	10(1)	3(20	1(4)	67	102
2	12(1)	8(2)		14(1)	10(2)	2(4)	11(1)	10(2)	1(4)	10(1)	6(2)	2(4)	89	139
3	12(1)	3(2)		10(1)	8(2)	2(4)	14(1)	8(2)	2(4)	10(1)	6(2)	2(4)	82	130
4	10(1)	5(2)		10(1)	5(2)	1(4)	10(1)	5(2)	1(4)	9(1)	5(2)	1(4)	62	91
5	10(1)	6(2)		12(1)	6(2)	2(4)	12(1)	6(2)	2(4)	10(1)	3(2)	1(4)	70	106
6	1091)	10(2)		10(1)	8(2)	2(4)	12(1)	9(2)	2(4)	10(1)	6(2)	2(4)	81	132
7	10(1)	4(2)		11(1)	5(2)	2(4)	8(1)	5(2)	1(4)	8(1)	5(2)	1(4)	58	91
8	6(1)	2(2)		6(1)	2(2)		5(1)	2(2)	1(4)	2(1)	3(2)	1(4)	30	45
9	5(1)	4(2)		5(1)	4(2)		5(1)	4(2)	1(4)	5(1)	3(2)	1(4)	37	58
10	4(1)	2(2)		4(1)	2(2)		4(1)	1(2)	1(4)	5(1)		1(4)	24	35
11	66(1)	1(2)		6(1)	2(2)		2(1)	2(2)	2(4)	3(1)	2(2)	1(4)	27	43
12	6(1)	2(2)		4(1)	4(2)		4(1)	3(2)	1(4)	4(1)	2(2)		30	44
13	8(1)	4(2)		9(1)	6(2)	1(1)	8(1)	4(2)		6(1)	3(2)	1(4)	50	73
14	10(1)	2(2)			8(1)	6(2)	2(4)	9(1)	2)2)	1(4)	8(1)	2(2)	50	71
15	10(1)	4(2)		2(1)	6(2)	5(4)	8(1)	4(2)	2(4)	8(1)	4(20	2(2)	54	86
16	9(1)	5(2)		5(1)	4(2)	1(4)	6(1)	4(2)	2(2)	5(1)	4(2)	1(4)	46	71
17	10(1)	5(2)		7(1)	4(2)	1(4)	8(1)	4(2)	2(2)	6(1)	6(2)	2(4)	51	85
18	12(1)	3(2)		8(1)	3(2)	1(4)	7(1)	4(2)	1(4)	7(1)	4(2)	1(4)	51	74

प्रश्नपत्रिका

पाठ -1 (कविता)

✹“झेंडा आमुचा”✹

कवी वि. म. कुलकर्णी

प्र-1 बहुपर्यायी प्रश्न

1) आपला भारत देश केंव्हा स्वतंत्र झाला

अ)1847

ब)1950

क)1947

ड)1949

2) आम्ही कोणाचे जयगीत गातो

अ)भारतमातेचे

ब)जनतेचे

क)वीरांचे

ड)परकीयांचे

3) तिरंगा झेंडा कोठे फडकत आहे असे कवीला वाटते

अ)सह्याद्रीच्या शिखरावर

ब)निलगीरी पर्वतावर

क)हिमालयाच्या शिखरावर

ड)माऊंट एव्हरेस्टवर

4)आमच्या झेंड्यातील तीन रंग कोणते

अ)हिरवा -तांबडा-नीळा

ब)केशरी-पांढरा-हिरवा

क)नीळा-पिवळा-पांढरा

ड)नारंगी-जांभळा-गुलाबी

5)झेंडा आमुचा ही कविता कोणी लिहिली

अ)वि. म. कुलकर्णी

ब)कवि सुधांशु

क)शांता शेळके

ड)कुसुमाग्रज

6)स्वातंत्र्यासाठी लढलेल्या वीरांना काय म्हणून ओळखले जाते

अ)देशद्रोही

ब)देशभक्त

क)समाजसेवक

ड)समाजकंटक

7)हा आपला स्वातंत्र्यदिन आहे

अ)26 जानेवारी

ब)2 ऑक्टोबर

क)5 सप्टेंबर्

ड)15 ऑगस्ट

8)शूरवीरांनी देशासाठी काय अर्पण केले

अ)प्राण

ब)संपत्ती

क)पुस्तक

ड)पर्वत

9)शाळेमध्ये राष्ट्रध्वज कोणकोणत्या दिवशी फडकवला जातो

अ)शाळा प्रारंभोत्सव

ब)बालदीन

क)पर्यावरण दिन

ड)स्वातंत्र्य दिन आणि गणाराज्य दिन

10) झेंड्यासाठी कोण कोण लढले

अ)सैनिक

ब)गांधी टिळक नेहरू जनता

क)श्रीमंतलोक

ड)परकीय लोक

प्रश्न II वचन बदला

11-झेंडा

12-शिखरे

13-देश

14-लाटा

प्रश्न III वाक्यात उपयोग करा

15-महान

16-झेंडा

17-प्रणाम

18-प्रिय

19-अर्पण

प्रश्न IV कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा

21-आम्ही रोज भारतमातेसाठी ----------------
गातो(आरती,कविता,जयगीत)

22-भारत माझा ---------------आहे(देश,राज्य,गांव)

23-हिमालयाच्या शिखरावर----------फडकतो(पतंग,तिरंगा,पताका)

24-समर म्हणजे (प्रवास,यात्रा,युद्ध)

25--------आमुची माता आहे(शिखर,भारतमाता,डोंगर)

प्रश्न -V समानार्थी शब्द लिहा

26-निशाण

27-वीर

28-मोठा

29-प्रिय

30-शिर

प्रश्न VI विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा

31-महान

32-उंच

33-जिंकणे

34-अप्रिय

35-वाईट

प्रश्न VII जोड्या जुळवा

36-15 ऑगस्ट ------------------------शिक्षक दिन

37-26 जानेवारी -----------------------बालदिन

38-12 ऑक्टोबर ----------------------स्वातंत्र्य दिन

39-14 नोव्हेंबर्------------------------गणराज्य दिन

40-5 सप्टेंबर-------------------------- गांधी जयंती

प्रश्न VIII कवितेच्या ओली पूर्ण करा

41-झेंडा आमुचा--

--आम्ही प्रणाम II धृ II

42-लढले गांधी--

अर्पूनि गेले --- II 2 II

43-भारतमाता--

फडकत ---निशाण ॥ 2 ॥

प्रश्न -IX एक वाक्यात उत्तरे लिहा

44-आपल्या झेंड्यात किती रंग आहेत?

45-आपल्या देशाचे नांव काय आहे?

46-आपण स्वातंत्र्यदिन केंव्हा साजरा करतो?

47-आपण प्रणाम कुणाला करतो असे कवि म्हणतो?

48-वीरांनी आपले प्राण कशासाठी अर्पण केले?

49-तिरंगा झेंडा कोठे फडकत आहे?

50-हिमलेंचे शिखर् कसे आहे?

51-तिरंग्याच्या मधोमध काय आहे?

52-झेंड्यासाठी कोण कोण लढले?

53-आपण कोणाचे जंयगीत गातो?

प्रश X थोडक्यात उत्तरे लिहा

54-स्वातंत्र्य मिळविण्यासाठी लढलेल्या वीरांची/देशभक्तांची नांवे लिहा

55-तिरंगा झेंड्यामधील रंगांची नांवे लिहा

56-तुला आवडलेल्या कोणत्याही एक कडव्याचा अर्थ तुझ्या वाक्यात लिही

57-हिरवा रंग कशाचे प्रतीक आहे?

58-“झेंडा आमुचा” किंव्हा तिरंगा याबद्दल चार ते पाच ओळी माहिति लिही

59-झेंड्यातील पांढरा रंग काय दर्शवतो?

60-अशोकचक्र ही कोणाच्या काळातील धर्मचक्र आहे?

61-अशोकचक्राचा रंग कोणता?व यामध्ये किती आरे आहेत?

62-अशोकचक्राचे प्रतीक कोणते?

63-राष्ट्र ध्वजातील पांढरा रंग काय दर्शवतो?

प्रश्न XI उत्तरे लिही

64-सुवाच्य अक्षरात झेंडा आमुचा कविता लिही

प्रश्न XII

65-चालीनुसार साभीनय कविता म्हण

प्रश्न XIII

66-झेंड्याचे चित्र काढ व रंग भर

प्रश्न XIV

67-विजयी विश्व तिरंगा प्यारा ही गीत मिळाव शिक्षकांच्या मदतीने चालीनुसार म्हण

पाठ -2

✸नेताजी सुभाषचंद्र बोस✸

प्रश्न I बहुपर्यायी प्रश्न

1-नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कधी झाला?

अ-15 ऑगस्ट 1947

ब-23 जानेवारी 1997

क-23 जानेवारी 1897

ड-2 ऑक्टोबर

2- सुभाषचंद्र बोस यांचा जन्म खालीलपैकी कोणत्या शहरात झाला?

अ-कटक

ब-पुरी

क-भुवनेश्वर

ड-कोणार्क

3-नेताजींच्या आईचे नांव काय होते?

अ-कमला देवी

ब-सरोजिनीबाई

क-अंजलिबाई

ड-प्रभादेवी

4- नेताजींच्या वडिलांचे नांव काय होते?

अ-जानकीनाथ

ब-किशोरनाथ

क-रामलाल

ड-जवाहरलाल

5-सुभाषचंद्र बोस कोणत्या शाळेत जात होते?

अ-सरकारी शाळा

ब-स्थानिक शाळा

क-प्रोटेस्टंट युरोपियन स्कूल

ड-मिशनरी शाळा

6-शाळेत इंग्रज मुले भारतीय मुलांना कसे वागवत असत?

अ-प्रेमाने

ब-आदराने

क-समानतेने

ड-शिव्या देत मारत चेष्टा करत

7-सुभाषचंद्र बोस कोण होते?

अ-सामान्यव्यक्ती

ब-थोरनेते

क-देशद्रोही

ड-श्रीमंतव्यक्ती

8-नेताजींनी आपले सर्वस्व कशासाठी अर्पण केले?

अ-भारताच्या स्वातंत्र्यासाठी

ब-स्वत्तासाठी

क-नातेवाईकांसाठी

ड-मित्रांसाठी

9-मैदानावर इंग्रज मुले खेळत असतांना भारतीय मळे कोठे बसली?

अ-मैदानावर

ब-शाळेत

क-झाडाखाली

ड-घरी

10-इंग्रज मुले व भारतीय मुले यांच्यामध्ये काय झाले/काय घडले?

अ-भांडण

ब-संभाषण

क-स्पर्धा

ड-मैत्री

प्रश्न II रिकाम्या जागा भर

11-सुभाषचंद्रांचा जन्मदिवस--------------रोजी साजरा करतात

12- सुभाषचंद्रांचा जन्म ---------------येथे झाला

13-जानकीनाथ ही सुभाषचंद्रांचे -----------------होय

14- सुभाषचंद्रांच्या आइचे नांव ----------------होते

15-स्वातंत्र्यासाठी स्वत:चे सर्वस्व अर्पण करून नेताजी --------------- झाले

16-नेताजींचे ------------अनेकांनी लहानपणीच जाणले होते

17-वयाच्या पाचव्या वर्षी एक घटनेने सुभाषचा--------आणि-------याचे दर्शन त्याच्या मित्रांना व इतरांना झाले

18-सुभाषचंद्र बोस-----------------या शाळेत जात असत

19-भारतीय मुलांनी ------------------च्या मुलांना चूपुन काढले

20-सुभाशच्या मित्रांना खूप --------------झाला

प्रश्न III अर्थ सांगा

21-सर्वस्व

22-धैर्य

23-बिचकणे

24-अर्पण करणे

25-दुष्ट

26-पक्ष

27-निर्भय

28-चेष्टा

29-प्रसंग

30-आनंद

प्रश्न IV विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा

31-आनंद

32-दुष्ट

33-भांडण

34-सामान्य

35-थोर

प्रश्न -V पुढील शब्दांचा वाक्यात उपयोग करा

36-पुढाकार

37-चोपणे

38-अमर

39-शिव्या

40-स्वाभिमान

प्रश्न VI वाच व शब्द पुन्हा लिही

41-भारतमातेच्या

42-पराक्रमी

43-जन्मदिवस

44-स्वातंत्र्यासाठी

45-प्रोटेस्टंट

46-स्कूलमध्ये

47-स्वाभिमान

48-सर्वस्व

49-राज्यातील

50-सामान्य

प्रश्न VII नमुन्याप्रमाणे लिही

नमूना -सुभाषचंद्र बोस-------नेताजी

51-वल्लबभाई पटेल--------------------------------

52-जवाहरलाल नेहरू-------------------------------

53-बाळ गंगाधर टिळक---------------------------

54-मोहनदास करमचंद गांधी---------------------------

55-विनोभा भावे---------------------------

प्रश्न VIII एका वाक्यात उत्तरे लिही

56-सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कैंव्हा झाला?

57-नेताजींनी स्वातंत्र्यासाठी काय अर्पण केले?

58-सुभाषचंद्र बोस कोणत्या शाळेत जात होते?

59-भारतीय मुले झाडाखाली का बसली होती?

60-घटनेनंतर निर्भयपणे कोणती मुले खेळू लागली?

61-इंग्रज मुलांना कोणी चोपून काढले?

62-आनंद कुणाच्या मित्रांना झाला?

63-झाडाखाली कोणती मुले बसली होती?

64-कोणी पुढाकार घेऊन खेळ सुरू केला?

65-भांडण कोणाकोणामध्ये झाले?

प्रश्न IX खालील वाक्य कोणी कोणास म्हटले आहे?

66-अरे तुम्हाला खेळायचे नाही का?

67-हो खेळायचे आहे ना! पण टी इंग्रज मुले खूप दुष्ट आहेत

68-तुम्हाला काय हात नाहीत?तुम्ही काय शेणामातीचे आहात?चला काढा चेंडू.

प्रश्न X खालील वाक्ये वाच व लिही

69-प्रत्येकाने शरीर स्वास्थ्य राखावे

70-देशाबद्दल स्वाभिमान असावा

71-देशसेवा ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे

72-मातृभूमि ही स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहे

73-अवांतर वाचन असावे

प्रश्न XI जोड्या जुळवा

74-सर्वस्व ----- धाडस

75-धैर्य ----- वाईट प्रवृत्ती

76-दुष्ट ------ सर्व कांही

77-बिचकणे ------- न घाबरता

78- निर्भयपणे ------ दचकणे

प्रश्न XII खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिही

79-सुभाषचंद्र बोस यांचा जन्म कैंव्हा व कोठे झाला?

80-सुभाषच्या पुढाकारामुळे काय झाले?

81-भारतीय मुले मैदानावर का खेळत नसत?

82-इंग्रज मुले भारतीय मुलांना कशाप्रकारे वागवत असत?

83-दिन आणि दीन या दोन्ही शब्दातील फरक ओळखून लिही

84-सुत व सूत या शब्दांचा अर्थ लिही

85-सुभाषणे भारतीय मुलांना खेळायला कसे प्रोत्साहित केले?

86-सुभाषचंद्र बोस कोणत्या शाळेत जात असत?त्या शाळेत कोणती मुले येत असत?

87-भारतीय मुलांना आनंद का झाला?

88-खून व खूण या दोन शब्दातील फरक ओळखून लिही

89-गृह व ग्रह या दोन शब्दातील फरक ओळखून लिह

पाठ 3 (कविता)

✸आई मला पावसात जाऊ दे✸

कवयित्री -वंदना विटगकर

प्रश्न 1 बहुपर्यायी प्रश्न

1-मुलगी पावसात जाण्यासाठी कोणाची परवानगी मागत आहे?

अ-बाबांची

ब-आजोबांची

क-आईची

ड-आजींची

2-पावसात भिजून चिंब चिंब कोणाला व्हायचे आहे?

अ-मुलगीला

ब-ताईला

क-दादाला

ड-आईला

3-गडगड असा आवाज कुणाचा येत होता?

अ-खेळण्याचा

ब-भांड्यांचा

क-वाहनांचा

ड-मेघांचा

4-नभातून कोण खुनवत आहे?

अ-मेघ

ब-वीज

क-सूर्य

ड-तारे

5-मुलीला पावसात काय करायचे आहे?

अ-पुस्तक वाचायचे

ब-भिजायचे

क-झोपायचे

ड-चित्र काढायचे

6-पाण्यात कोणाचा पाठलाग करायचा आहे?

अ-कुत्रा व मांजर

ब-गाय व बैल

क-मासा व खेकडा

ड-बदक व बेदुकदादा

7-धारेखाली मुलीला काय करायचं आहे?

अ-पाणी उडवायच

ब-गाणं गायच

क-धावायच

ड-झोपायच

8-खिडकीखाली काय साचले आहे?

अ-कचरा

ब-खेळणी

क-तळे

ड-दगड

9-अंगणात काय करायच आहे?

अ-नाचायच

ब-रडायच

क-पळायच

ड-बसायच

10-शर्यत कशाची लावायची आहे?

अ-बदकांची

ब-माशांची

क-होड्यांची

ड-घारांची

प्रश्न II रिकाम्या जागी योग्य शब्द भरा

11-मुलाला ------------त जायच आहे

12-भिजून --------------व्हायच आहे

13-------------गडगड करीत आहे

14-----------नभातून खुनवीत आहे

15---------------खाली तळे साचले आहे

16-गुडघ्याइतके ---------------भरले होते

17-----------------शर्यत लावायची आहे

18-बदकांचा थवा -----------करत आहे

19-धारेखाली ----------------------चे आहे

20-----------------ने पाणी उडवून खेळायच

प्रश्न III खालील ओळी पूर्ण कर

21-मेघ कसे हे ---------------------

विजा नभातून---------------------

22-खिडकी खाली--------------------

गुडघ्या इतके-------------------

23-बदकांचा बघ -------------------

बेडूकदादा-----------------------------

24-धारेखाली --------------------------

पायाने मी -----------------------

प्रश्न IV नात्यातील व्यक्तींची नांवे सांग व लिही

25-आजोबा -----------------------------

26-आजी ------------------------------

27-आई ----------------------------

28-बाबा ---------------------------

29-काका -----------------------

30-काकू -------------------------

31-ताई --------------------------

32-दादा -------------------------

33-मामा ------------------------

34-मावशी ----------------------------

प्रश्न V शब्दांचे अर्थ लिही

35-मेघ

36-खुनविणे

37-नभ

38-तऱ्हे-तऱ्हेच्या

39-पाठलाग

प्रश्न VI खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा

40-आई

41-थवा

42-पाणी

43-पाऊस

44-शर्यत

प्रश्न VII वचन बदला

45-खिडकी

46-तळ

47-बदक

48-बेडूक

49-विजा

प्रश्न VIII कंसातील शब्दांची निवड करून प्राणी/पक्षांचे नांव व त्यांचा आवाज यांच्या जोड्या जुळवा

[कुंजन,भुंकणे,किलबिल,डरकाळी,चिवचिव,गर्जना,गुणगुण,हंबरने]

50-कोकिळेचे -------------------------

51-गायीचे----------------------

52-सिंहाची --------------------

53-चिमणीची-------------------

54-कुत्र्याचे---------------------

55-पक्षांची ------------------------

56-वाघाची --------------------

57-डासांची-----------------------

प्रश्न IX खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही

58-पावसात कुणाला जायच आहे?

59-मुलगी पावसात जाण्यासाठी कुणाला विचारत आहे?

60-पावसाच्या पाण्यात कुणाला भिजून चिंब चिंब व्हायचे आहे?

61-मेघांचा आवाज कसा येतो?

62-कवितेतील मुलीला नभातून कोण खुनवत आहे?

63-आई मला पावसात जाऊ दे या कवितेच्या कवयित्री कोण आहेत?

64-तळे कुठे साचले आहे?

65-पावसाचे पाणी किती भरले आहे?

66-कशाची शर्यत लावायची आहे?

67-हाक कोण मारत आहे?

68-बदकांचा थवा काय करत आहे?

69-पाण्यामधुणी कुणाकुणाला पाठलाग करायचा आहे?

70-कवितेतील मुलीला कुठे उभे राहायचे आहे?

71-पायाने काय करायचे आहे?

72-कवितेतील मुलीला पावसाच्या आनंदाने कुठे नाचायच आहे?

प्रश्न X दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही

73-पावसात जाऊन काय काय करावेसे वाटते आहे?

74-कवितेतील मुलीला कोणासोबत व कोठे नाचायच आहे?

75-शर्यत कुठे आणि कोणत्या प्रकारच्या होड्यांची लावायची आहे?

76-पावसात भिजून,खेळून काय काय झाल तरी चालेल असे कवितेतील मुलगी म्हणते आहे?

77-तू पावसात कशाप्रकारे खेळशील?

78-पाऊस कोणत्या महिन्यात पडतो?

79-कवितेतील मुलीला आई पावसात जाण्यापसून का अडवित असेल असे तुला वाटते?

80-पाऊस पडल्यानंतर काय झाले?

81-मुख्य ऋतु किती व कोणकोणते?

82-पावसाळ्यात आपण कोणती व कशाप्रकारे काळजी घेतली पाहिजे?

पाठ -4

✸घरचा वैद्य✸

प्रश्न I बहुपर्यायी प्रश्न

1-प्रेम आणि प्रतीक्षा सुट्टीत कुठे गेली होती?

अ-सहलीला

ब-बाजारात

क-आजोळी

ड-शाळेला

2-दिव्या व अंकुर ही कुणाची मुले आहेत?

अ-मामांची

ब-मावशीची

क-काकांची

ड-मित्राची

3-बागेत कोण फेरफटका मारत होते?

अ-आजी

ब-मामा

क-मामी

ड-आजोबा

4-आजोबांची बाग म्हणजे काय होती?

अ-फुलांची बाग

ब-घरचा वैद्य

क-दवाखाना

ड-घर

5-पक्षांचा किलबिलाट कुठे चालू होता?

अ-झाडावर

ब-डोंगरावर

क-शेतात

ड-घरावर

6-तुळशीच्या रोपांचा काय उपयोग होतो?

अ-खोकला वाढतो

ब-पोट दुखते

क-झाडे वाळतात

ड-हवा स्वच्छ राहते

7-खोकल्यावर गुणकारी रोप कोणते?

अ-अडुळसा

ब-कोरफड

क-ओवा

ड-गावती चहा

8-बागेला घरचा वैद्य असे का म्हटले आहे?

अ-तिथे डॉक्टर असतात

ब-औषधी वनस्पती असतात

क-घर असते

ड-मुले खेळतात

9-गवती चहा काशावर गुणकारी आहे?

अ-थंडी

ब-ताप

क-अंगदुखी

ड-सर्दी

10-वणाराईसी मैत्री करून पर्यावरणाचे रक्षण करा असा उपदेश कोणी केला?

अ-प्रेम

ब-अंकुर

क-मामा

ड-आजोबा

प्रश्न II रिकाम्या जागा भरा

11-मामाच्या गावाला ------------------------म्हणतात

12-आजूबाजूचा परिसर म्हणजेच -------------

13-वनराई म्हणजेच -------------------झाडी

14-आजोबा बागेत -------------------------मारत होते

15-ओव्याची पाने खाल्यास ------------------थांबते

16--------------------पाने खोकल्यावर गुणकारी आहेत

17---------------------च्या रोपामुळे हवा स्वच्छ राहते

18-सर्दीसाठी उपयोगी असलेली वनस्पती --------------होय

19---------------आणि -------------सुट्टीत आजोळी गेली होती

20---------------आणि ------------ही मामांची मुले ही तिथे आली

प्रश्न III खालील वाक्ये चूक की बरोबर ते लिही

21-सकाळी उठल्यानंतर प्रेम बागेत गेला------------------

22-आजोबा बागेतील रोपांची देखभाल करत नसत---------------

23-औषधी वनस्पती उपयोगी नाहीत ------------------

24-निसर्गावर प्रेम करावे--------------------

25-बागेत तुळस दूर्वा सबजा गवती चहा ओवा बडिशेफ कोरफड आले अशा वनस्पती होत्या

प्रश्न IV 26 खालील आजारावरील औषधी वनस्पती ओळखून जोड्या जुळव

1-सर्दी -------------- अडुळसा

2-खोकला ------------कडूनिंब

3-पोटदुखी -----------गवतीचहा

4-पित्त ------------ओवा

5-त्वचाविकार-----------आले

प्रश्न V नमुन्याप्रमाणे लिही

जसे - पळणे-----पळा------पळतात

27-ओरडणे ---------------- ---------------------

28-बसणे ---------------- -------------------

29-बघणे --------------- --------------------

30-झोपणे ---------------- ---------------------

31-वाचने ------------------- ----------------------

प्रश्न VI 32-खालील वर्तुळात वनस्पतींची नांवे दिलेली आहेत

उदा. दाखविले प्रमाणे त्याचे वर्गीकरण कर

गहू चिंच द्राक्ष

दोडका भोपळा पेरू

जोंधळा नाचणा कारले

नारळ पपई भात

वेल	*रोप*	*झाड*
दोडका	भात	नारळ

प्रश्न VII खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही

33-आजोळी कोण कोण गेले होते?

34-मामाच्या मुलांची नांवे काय आहेत?

35-बागेत आजोबा काय करत होते?

36-बागेत कोणत्या फळांची झाडे होती?

37-पोट दुखणे कशामुळे थांबते?

38-प्रेमला डॉक्टरांनी खोकल्यावर कोणते औषध दिल होत?

39-सर्दी कमी होण्यासाठी चहामध्ये कशाचा उपयोग करावा?

40-कोणत्या रोपामुळे डास कमी होतात?

41-कोथंबीर व कडीपत्ता यांचा वापर कशामध्ये करतात?

42-आजोबा बागेची कशी काळजी घेत असत?

प्रश्न VIII खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली आहेत ते लिही

43-“आजोबा” ही कसली वेगळीच रोपे लावलीत तुम्ही?

44-“अग”ही सर्व बाग म्हणजे घरचा वैद्य आहे!

45-“काय हो आजोबा बाग आणि घरचा वैद्य काहीतरी बोलू नका”

46-“अगदी बरोबर! अडुळशाच्या पानांचा रस साखर किंव्हा गूळ घालून प्यायल्याने खोकला गेलाच समजा”

47- “आजोबा आता आमच्या शाळेतील बागेत टिचरांना सांगून अशा वनस्पती लावू” तेंव्हा आमच्या शाळेतही कायमचे वैद्य असतील!

प्रश्न IX खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिही

48-आजोबांच्या बागेत कोणत्या औषधी वनस्पति होत्या?

49-आजोबांच्या बागेत कोणकोणती झाडे होती?

50-आजोबांनी लावलेल्या तुळशीच्या रोपंचा काय उपयोग होतो?

51-बागेला घरचा वैद्य असे का म्हणतात?

52-पर्यावरणाचे रक्षण कसे करावे?

53-झाडांपासून आपणास काय काय मिळते?

54-योग्य क्रमाने शब्द लिही पान,फांदी,फूल,रोप,बीज,अंकुर,फळ

55-शेवटी आजोबांनी मुलांना कोणता उपदेश केला?

56-तुला माहीत असलेल्या सुवासिक फुलांच्या वनस्पतींची नांवे लिही

57-कडूलिंब या वनस्पतीचा उपयोग लिही

प्रश्न X माहिती लिही/सांग

58-मी पाहिलेली बाग

59-आजोबांचा घरचा वैद्य

प्रश्न XI 60-तुझ्या आवडीचे खालीलपैकी एक चित्र काढ व रंग भर

फळ - आंबा

फूल - सूर्यफूल

वनस्पतींची पाने

प्रश्न XII 61-एक झाड लावू मित्रा त्याला पाणी घालू ही अनंत गीते यांचे पर्यावरण गीत मिळवून वाच व चालीनूसार पाठांतर कर.

(पालक शिक्षकांची मदत घे)

62-“मुलांनो थोडे ऐकाल का?

झाडांचे रक्षण कराल का?

पाठ - 5

✸खेळ लगोरीचा✸

प्रश्न -1 बहुपर्यायी प्रश्न

1-कोणत्या जेवणानंतर थोडी सुस्ती आली होती?

अ-सकाळच्या

ब-रात्रीच्या

क-काल दुपारच्या

ड-दुपारच्या

2-ताईचा कोणता तास झाला?

अ-गायनाचा

ब-खेळाचा

क-चित्रकलेचा

ड-व्यायामाचा

3-ताईंनी गोड आवाजात काय शिकविली?

अ-बडबडगीत

ब-प्रार्थना

क-अभिनय गीत

ड-देशभक्ती गीत

4-सर्वांनी कुणासारख्या उड्या मारून गाणे म्हटले?

अ-सस्यासारख्या

ब-घोड्यासारख्या

क-माकडासारख्या

ड-बेडकांसारख्या

5-सर्वांना कोणत्या तासाची आतुरता लागली होती?

अ-गणिताच्या

ब-इंग्रजीच्या

क-भूगोलाच्या

ड-खेळाच्या

6-ताई कोणता खेळ खेळुया असे म्हणाल्या?

अ-लंगडी

ब-लगोरी

क-खो-खो

ड-साखळीखेळ

7-मुलांनी खेळासाठी किती गट केले?

अ-दोन

ब-चार

क-तीन

ड-आठ

8-वर्गात जावून सर्वेशने काय आणले?

अ-पुस्तक

ब-वही

क-बॅट

ड-चेंडू

9-मुलांना लगोरी खेळाचे महत्व कोणी विचारले?

अ-सरांनी

ब-ताईंनी

क-आईने

ड-दादाने

10-लगोरी खेळ कोणी जिंकला?

अ-मुलं

ब-मुली

क-दोघंही

ड-ताई

प्रश्न II रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पूर्ण कर

11-----------------नी सर्वांना रांगेत उभे केले

12-सादीकणे---------------आणल्या

13-पहिल्यांदा सुरुवातीला ----------------ने चेंडू आणला

14--------------------नी तीन डाव जिंकले

15-चेंडू ------------------होता

16-मुलांनी ----------------डाव जिंकला

17-शेवटी ------------------नीच लगोरीचा खेळ जिंकला

18-ताईंनी सर्वांना -------------------खेळाचे महत्व विचारले

19-खेळाचे सर मैदानावर नव्हते म्हणून मुलांचे चेहरे ------------------झाले

20-ताईंनी मजेदार -------------ही गाणे शिकविले

प्रश्न III गटात न जुळणारा शब्द ओळखून गोल कर

21-चेंडू बॅट विटी स्टंप

22-विटी दांडू बॅट लगोरी

23-खुर्ची पुस्तक वही पट्टी

24-कॅरम बुद्धिबळ पत्ते फुटबॉल

25-पतंग दोर मांजा सोंगट्या

प्रश्न IV विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा

26-आनंद

27-गोड

28-जिंकणे

29-आळस

30-पकडणे

31-धीट

32-दिवस

प्रश्न V दोन गटांनी मिळून खेळत येणारे खेळ लिही

33-------------------------

34-------------------------

35-------------------------

36--------------------------

37--------------------------

प्रश्न V खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

38-मुलांनी खेळण्यासाठी किती गट केले?

39-सर्वांना कोणती आतुरता लागली होती?

40-नेम कुणाचा चुकला?

41-ताईंनी मुलांना कोणते मजेदार गाणे शिकविले?

42-मुलांना प्रार्थना कोणी शिकविली?

43-कोणता खेळ खेळण्याचे ठरले?

44-ताईंनी कशा बद्दलच्या सूचना दिल्या?

45-मुलांनी सस्याचे गाणे कसे म्हटले?

46-“उदास होवू नका”असे कोणी म्हटले?

47-घंटा झाल्यावर सर्व मुले कोठे गेली?

प्रश्न VII दोन ते तीन वाक्यात/थोडक्यात उत्तरे लिही

48-खेळाचे प्रकार किती आहेत? व कोणते?

49-ताईंनी मुलांना खेळांबद्दलच्या कोणत्या सूचना दिल्या?

50-क्रिकेट खेळासाठी लागणारे साहित्य कोणते?

51-मैदानी खेळ म्हणजे काय?

52-बैठे खेळ म्हणजे काय?

53-खेळ का खेळणे आवश्यक आहे?

54-तुझ्या आवडीच्या खेळांची नांवे लिही

55-ताईंनी खेळासाठी विचारल्यानंतर मुलांनी कोणकोणत्या खेळांची नांवे सांगितली?

56-भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता?

57-लगोरी खेळासाठी कोणकोणते साहित्य लागते?

प्रश्न VIII उत्तरे लिही

58-लगोरी खेळातून साधता येणारी कौशल्ये कोणती क्रमाने लिही

59-मैदानी खेळांची यादी करा

60-बैठे खेळ कोणते यादी कर

61-मनोरंजनसाठी साहित्य न वापरता कोणते खेळ /भेंड्या खेळतात?

प्रश्न IX खालील चौकटीत खेळांची नांवे लपली आहेत ती शोध व लिही

ल	पं	डा	व	स	प	क्रि	के	ट	व्हॅ
गो	ळा	फे	क	ब	ड्डी	र	क	म	ली
रि	त	ळ्या	त	म	ळ्या	त	ब	व	बॉ
खो	लं	ग	डी	त	बा	स्के	ट	बॉ	ल
खो	स्क	क्य	मी	टी	म्य	च	ठ	गो	क

62--------------------------

63--------------------------

64--------------------------

65-------------------------

66-------------------------

67-------------------------

68--------------------------

69--------------------------

प्रश्न 70 कृती कविता शोधून वाच व लिही

पाठ 6 (कविता)

✸आवडती मज✸

कवी गोविंद केळकर

प्रश 1 बहुपर्यायी प्रश्न

1-कवींना लाल चोचीचा कोणता पक्षी आवडतो?

अ-पोपट

ब-कावळा

क-चिमणी

ड-मोर

2-मिरची पेरू पिकले डाळिंब हा फराळ कुणाचा आहे?

अ-गायीचा

ब-खारूताईचा

क-कुत्र्याचा

ड-पोपटाचा

3-इकडून तिकडे झाडावर सरसर कोण पळते?

अ-चिमणी

ब-पाल

क-झुरळ

ड-खार

4-खारुताईंची शेपूट कशी आहे?

अ-गोंडेदार

ब-सुंदर

क-लाल

ड-लांब

5-इवलीशी असे कवींनी कुणाला म्हटले आहे?

अ-पाल

ब-चिमणी

क-मुंगी

ड-खार

6-चिमणीताई गाणे कसे म्हणते?

अ-सुंदर

ब-मोठ्याने

क-गोड

ड-चिवचिव

7-कवितेतील कुत्र्याचे नांव काय?

अ-मोत्या

ब-गोट्या

क-पिंट्या

ड-बाव्या

8-खरा इमानी प्राणी असे कोणाला उद्देशून म्हटले आहे?

अ-मांजर

ब-कुत्रा

क-गाय

ड-ससा

9-ऐटदार कोण चालतो?

अ-घोडा

ब-गाढव

क-कुत्रा

ड-कोंबडा

10-कोंबडा कवींना कसे जागे करतो?

अ-ओरडून

ब-आरवून

क-गाणे म्हणून

ड-बोलून

प्रश्न 2 रिकाम्या जागा भर

11-कवि प्राणी पक्षांसोबत------------दिवशी खेळणार आहेत

12-कवितेत आलेल्या गाईचे नांव काय आहे?

13-गाय ही सर्व जगाची माय आहे असे --------------म्हणते

14-कोंबड्याच्या डोईवर --------------असतो

15-कोंबडा हा कवींचा खरा -----------आहे

16- कवींचा मोत्या सदा ----------------असतो

17-मोत्या कुत्रा --------------राखण करतो

18-चिमणी ------------झुलते

19-पोपटाची चोच ----------------असते

20-“आवडती मज” या कवितेचे कवी---------हे होत

प्रश्न -शब्दांचे अर्थ सांगा

21-वाकुल्या दाखविणे

22-इमानी

23-ऐटदार

24-गट्टी

25-माय

प्रश्न - IV वर्तुळातील शब्दाशी दिलेले शब्द जोडून नवनवीन शब्द बनव,लिही व वाच

26-ऐट

27-गोंडे

28-दम

दार

29-इमान

30-चव

31-झुपके

प्रश्न -V खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर

32-आवडतो मज पोपट हिरवा

33-मोत्या आमुचा सदा भुंकतो

34-इकडून तिकडे झाडवरी

35-ऐटदार चालतो कोंबडा

36-शिंगे सुंदर रंग काळा

प्रश्न -VI वचन बदल

37-पोपट

38-खारी

39-चिमणी

40-कुत्री

41-कोंबडा

42-गायी

43-शिंक

44-शेपट्या

प्रश्न -VII खालील नमुन्याप्रमाने लिही

नमूना -मुलगा -मुलगी

45-कोंबडा

46-कुत्रा

47-गाय

48-चिमणी

49-मोर

50-वाघ

51-कावळा

52-घोडा

प्रश्न VIII कवितेतील लयाबद्द शब्द शोध व लिही

53------------- ------------------

54------------- ------------------

55------------- ------------------

56------------- ------------------

57------------- -------------------

58------------- ------------------

59------------- ------------------

प्रश्न IX 60-प्राणी आणि घरे यांच्या जोड्या जुळव

अ-कोंबडा	अ-गोठा
ब-साप	ब-गुहा
क-चिमणी	क-खुराडे
ड-सिंह	ड-वारूळ
इ-गाय	इ-घरटे

प्रश्न X एका वाक्यात उतारे लिही

61-पोपटाचा रंग कोणता आहे?

62-पोपटाला फराळ खाण्यास काय लागते?

63-कवितेतील मोत्या कुणाचे नाव आहे?

64-आरवून जागे कोण करते?

65-गायीला आजीने काय म्हटले आहे?

66-कवींची गट्टी कुणासी पक्की झाली आहे?

67-कपिला गायीची शिंगे कशी आहेत?

68-कपिला गायीचा रंग कोणता आहे?

69-भुर्रकन कोण उडून जाते?

70-गोंदेदार शेपूट कुणाची आहे?

प्रश्न XI थोडक्यात उत्तरे लिही (दोन ते तीन वाक्यात)

71-“आवडती मज” कवितेत आलेल्या पक्षांची नांवे कोणती?

72-कवितेत आलेल्या प्राण्यांची नांवे लिहा

73-कपिला गायीचे वर्णन कसे केले आहे?

74-कवितेतील कुत्र्याचे वर्णन कवींनी कसे केले आहे?

75-पोपटाविषयी कवी काय म्हणतात?ते लिही

76-तुला माहीत असलेल्या प्राण्यांची नांवे लिही

77-तुला माहीत असलेल्या पक्षांची नांवे लिही

78-कवी कोणाकोणासोबत सुट्टीच्या दिवशी खेळणार आहेत?

प्रश्न XII 79-कल्पना कर खालीलपैकी प्राणी/पक्षी झालास तर काय करणार?

प्रश्न XIII सुवाच्य अक्षरात कविता लिही व कविता अभिनयासह कविता म्हण

प्रश्न IV पोपटाच चित्र काढ व रंग भर

पाठ 7

✸पिंजऱ्यातील सुंदर पक्षी✸

प्रश्न 1 खाली दिलेल्या प्रश्नाचे अचूक उत्तर निवडून उत्तरे लिहा

1-रंजना कोणत्या इयत्तेत शिकत होती?

अ)दुसरी

ब)पहिली

क)तिसरी

ड)चौथी

2-रंजनाची सहल कोठे जाणार होती?

अ)प्राणी संग्रहालय

ब)मंदिराला

क)समुद्रकिनारी

ड)वस्तु संग्रहालय

3- प्राणीसंग्रहालया मध्ये आणखी काय होते?

अ)पक्षी(रंगीबेरंगी)

ब)माकड

क)हत्ती

ड)सिंह

4-रंजनाला बाबांनी आणखी काय आणून दिले?

अ)गाडी

ब)खेळणी

क)बाहुली

ड)पिंजरा

5-रंजनाला अपघातात कोणती इजा झाली?

अ)हात मोडला

ब)डोक्याला मार लागला

क)पायाचे हाड मोडले

ड)काहीच नाही लागले

6-डॉक्टरांनी किती दिवसांची विश्रांती दिली?

अ)पंचवीस दिवस

ब)दहा दिवस

क)पंधरा दिवस

ड)वीस दिवस

7-रंजनांच्या स्वप्नात कोण आले?

अ)बाबा

ब)आई

क)मैत्रीणी

ड)पिंजऱ्यातील पक्षी

8-पिंजऱ्यातील पक्षाला कोणाची आठवण आली?

अ)आई वडिलांची

ब)मित्र मैत्रीणिंची

क)आई,वडील,मित्र-मैत्रीणिंची

ड)रंजनाची

9-रंजनाने पिंजऱ्यामध्ये काय ठेवले?

अ)रंगबेरंगी पक्षी

ब)ससा

क)कबुतर

ड)पोपट

10-रंजनाला कोणाची आठवण येऊ लागली?

अ)बाबांची

ब)आईची

क)शाळेतील मैत्रीणिंची

ड)कोणाचीही नाही

प्रश्न II रिकाम्या जागा भर

11-रंजनालाही वाटू लागले की आपणही घरी -------------पाळावेत

12-पक्षांना छोट्या ---------------कोंडून ठेऊ नये

13-पायाला ----------------घातले गेले

14-पक्षी आनंदाने आकाशात उंच ---------------घेऊन निघून गेले

15-एकदा शाळेतून येतांना एक छोटासा --------------झाला

प्रश्न III एका वाक्यात उत्तरे लिहा

16-रंजना कोठे गेली होती?

17-पिंजऱ्यातील पक्षी कसे होते?

18-प्राणी संग्रहालयात प्राण्यांबरोबर आणखी काय होते?

19-रंजनाने बाबांजवळ कोणता हट्ट धरला?

20-रंजनाला किती दिवस विश्रांती घ्यावी लागली?

21-हार पत्करणे म्हणजे काय?

22- प्राणीसंग्रहालय म्हणजे काय?

23-तू पाहिलेल्या पक्षांची यादी कर

24-पक्षाने आनंदाने कोठे भरारी घेतली?

25-सहलीला मुले कशातून गेली?

प्रश्न IV जोड्या जुळवा

26-गाय -- घरटे

27-घोडा -- जंगल

28-पक्षी -- गुहा

29-वाघ -- तबेला

30-हत्ती -- गोठा

प्रश्न V दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा

31-तू पाहिलेल्या पक्षांची यादी कर

32-बाबांनी रंजनाला काय समजावले?

33-पिंजऱ्यातील पक्षाने रंजनाला काय सांगितले?

34-रंजनाने बाबांची क्षमा केंव्हा मागितली?

35- रंजनाचे मन का रमेनासे झाले?

प्रश्न VI जोडून येणारे शब्द पूर्ण कर

36-खाणे ---------------

37-येणे ----------------

38-रूसणे ------------------

39-उठणे-------------------

40-बोलणे------------------

41-नाचणे------------------

प्रश्न VII समानार्थी शब्द लिहा

42-मौज

43-विविध रंगी

44-मनसोक्त

45-हार पत्करणे

प्रश्न VIII विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा

46-हार ×

47-दिवस ×

48-आकाश ×

50-आनंद ×

प्रश्न IX दिलेल्या छोट्या वर्तुळातील शब्दासी वर्तुळाबाहेरील शब्द जोडून शब्द तयार करून लिही

51-

52-

53-

54-

उन्हा जंगाला आकाशा

शाळे तून गाडी

घरा पावसा

55-

56-

प्रश्न X 57 तुझा आवडता पक्षी यावर माहिती लिही

प्रश्न XI 58-प्राण्यांची चित्रे जमव व चित्र संग्रह तयार कर

पाठ 8

✹फुलपाखरा✹

प्रश्न 1) गाळलेल्या जागा पर्याय शब्द निवडून भरा

(पर्याय -रंगांनी अंग मोज लपंडाव)

1---------------------चल खेळुया नाचुया रे बागडूया

2-सुंदर सुंदर -----------------------रंगविले

3-मऊ मऊ तव -----------------------किती किती करसी गमती जमती

4-तुजसंगे धावायला --------------वाटते फार मला

प्रश्न 2 जोड्या जुळवा

1-पिवळा	बुंद
2-काळा	शुभ्र
3-नीळा	धमक
4-लाल	शार
5-पांढरा	भडक

प्रश्न 3 खालील प्रश्नांची उत्तरे लिहा

1-कवितेत कोणाला उद्देशून म्हटले आहे?

2-फुलपाखरू कसे आहे?

3-फुलापाखराला कोणी रंगविले आहे?

4-फुलापाखराचे पंख कसे आहेत?

5- फुलापाखराचे अंग कसे आहे?

6-कोणाला फुलपाखरू आवडते?

7-फुलपाखराबरोबर धावंतांना काय वाटते?

8-लपंडाव कोणाबरोबर खेळला जात आहे?

9-फुलपाखरू कशामुळे उडते?

10-फुलापाखराला हात का लावू नये?

प्रश्न 4 सूचनेप्रमाणे लिहा

अ)समानार्थी शब्द लिहा

1-छान =

2-पंख =

3-मौज =

4-खेळ =

ब)विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा

1-सुंदर

2-मऊ

3-मित्र

4-खरे

क)अनेकवचन लिहा

1-फुलपखरू

2-रंग

3-पंख

तोंडी परीक्षा

1-फुलपाखरू कसे आहे?

2-फुलपाखरांचे अंग कसे आहे?

3-कोण जास्त आवडते?

4-फुलपाखराबरोबर कोणता खेळ चालू आहे?

5-फुलपाखरू या कवितेचे कवी सांगा

पाठ 9 वा

✸रस्ता पार करताना✸

प्र.1- बहुपर्यायी प्रश्न

1. रोहित व त्याचे आजोबा एके दिवशी कोठे निघाले होते?

A.) फिरायला B. गावाला 3. बाजारात 4. बागेत

2. रोहित हा कितव्या इयत्तेत शिकत होता?

A. चौथी B.तिसरी C. दुसरी D.पाचवी

3. रोहित रस्त्यावर कसा चालत होता?

A.सरळ B.बाजुने C. वेडे वाकडे D.पळत

4. रोहितच्या समोरून काय आले व अपघात होता होता टळला?

A. रिक्षा B.बसC.मोटार D.सायकल

5. रस्त्याने जाताना नियमित कोणत्या बाजूने जावे?

A. उजव्या B.डाव्या C.वर D.खाली

6. रस्ता पार करताना कसे जावे?

A. पळत पळत B. नेहमी डाव्या व उजव्या बाजूला कोणतेही वाहन येत नसल्याची खात्री करून

C. उजव्या बाजूने D.डाव्या बाजूने

7. रस्ता पार करताना कोणत्या रंगाच्या पट्ट्या मधून जावे?

A. पिवळ्या व पांढऱ्या B.निळ्या व पांढऱ्या C.लाल व पिवळ्या D.पिवळ्या व हिरव्या

8. लाल दिवा काय सांगतो?

A. पुढे जा B.थांबा C .उभे रहा D.

निघून जा

9. रोहित बाजारात कोणाबरोबर गेला होता?

A. आजी B.आजोबा C.बाबा Dआई

10. हिरवा दिवा काय सांगतो सांगतो?

A. थांबा B.तयारी करा C.पुढे जा D.उभे रहा

प्र.2. रिकाम्या जागा भरा-

11. रोहित व त्याचे....... एके दिवशी संध्याकाळी बाजारात निघाले होते

12. रोहित........ इयत्तेत शिकणारा मुलगा होता

13. रोहित रस्त्याने जाताना रहदारीचे काही ....आहेत

14. रस्त्याने जाताना नेहमी....... बाजूने जावे

15. चौकात ....लागले होते

16. रस्त्यावर ....व पांढऱ्या रंगाचे पट्टे मारलेले असतात

17..........दिवा लागल्यावर थांबावे

18. रोहित व आजोबा बाजारात जाऊन........ घेऊन आले

19..........दिवा लागला असता पुढे जाण्यासाठी तयार राहावे

20.........दिवा लागताच पुढे जावे.

प्र.3- एका वाक्यात उत्तरे लिहा-

21. रोहित व आजोबा कोठे निघाले होते?

22. लाल दिवा काय सांगतो?

23.रोहित व आजोबांनी काय काय आणले?

24. रोहित कोणत्या इयत्तेत शिकत होता?

25. हिरवा दिवा काय सांगतो?

26. रस्त्याने जाताना कोणत्या बाजूने जावे?

27. शहरात मुख्य चौकात काय लागलेले असतात?

28. रस्त्याने चालत जाताना कोणत्या रंगाच्या पट्ट्यावरून जावे?

29. पिवळा दिवा काय सांगतो?

30. रोहित समोरून अचानक काय झाले व अपघात टळला?


प्र.4- दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा-


31. आजोबांनी रोहितला काय सांगितले?

32. झेब्रा क्रॉस कशाला म्हणतात?

33. कोणता दिवा लागताच पुढे जावे?

प्र.5- जोड्या जुळवा-

34. -  --- पुढे चला

35 -  --- थांबा

36-  --- तयार राहा

प्र.-6 37-रहदारीचे नियम,रहदारीची चिन्हे व त्यांची माहिती समजून घ्या-

पाठ 10

✸रेल गाडी✸

प्रश्न 1 एका वाक्यात उत्तरे लिहा

1-रेल्वे चालतांना कसा आवाज येतो?

-धाड धाड खाड खाड असा आवाज येतो

2-रेल गाडीचा वेग कधी मंदावतो?

-डोंगराचा घाट आल्यानंतर रेल गाडीचा वेग मंदावतो

3-रेल गाडीची शीळ कोठे घुमते?

-रेल गाडीची शीळ पहाडात घुमते

4-काळोख कोठे आहे?

-काळोख चहूकडे आहे

5-दऱ्यांच्या मध्ये काय दिसते?

-दऱ्यांच्या मध्ये जंगलाची हिरवाई दिसते

6-सिग्नलच्या कोणत्या रंगाच्या दिव्याला थांबायला हवे?

-लाल दिवा लागला असता थांबायला हवे

7-गाडीतून केंव्हा उतरायला हवे?

-रेलतळ आल्यानंतर गाडीतून उतरायला हवे

8-गाडीतून कसे उतरावे?

-गाडीतून सावकाश उतरावे

प्रश्न 2 समानार्थी शब्द लिहा

9-जंगल -अरण्य

10-मंद –सावकाश

11-अंधार-काळोख

12-रस्ता –मार्ग पथ

13-डोंगर-

प्रश्न 3 14- येथे दोन चौक दिलेले आहेत चौकाच्या आतील व बाहेरील शब्दांचा वापर करून नवीन शब्द बनवा.

15)

मास	दिवस	तंटा
दगड		उठ
रात्र	भांडण	दिस
बस		धोंडे

16)

वाडी	पाडी	दार
खेडी	रेल	गाठ
राने	शेती	घर
वने	भेट	तळ

17)

पिण	तहान	गांव
गडबड		थट्टा
	रेल	
नाव		खाण
मस्करी		गोंधळ

प्रश्न 4 दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा (2 गुणांचे प्रश्न)

18) कवितेच्या ओळी पूर्ण करा

झपाट्याने मागे जाती

रानेवने खेडीपाडी

19) गाडी उजेडात येई

दिसे दऱ्यातील पुन्हा

जंगलाची हिरवाई

20) सिग्नलचा लाल दिवा

हवे इथे थांबायला

21) सावकाश उतरावे

नका करू घाई

पुन्हा भेटू केंव्हा तरी

नमस्कार-नमस्कार !

प्रश्न 5 तीन चार वाक्यात उत्तरे लिहा (3 गुणांचे प्रश्न)

22-तु कोणकोणत्या वाहनांनी प्रवास करतोस त्यांची नांवे लिही

-मी बस,रेल्वे विमान बाईक सायकल या वाहनांनी प्रवास केलेला आहे

23-पूर्वीच्या काळी प्रवासासाठी कोणकोणत्या प्राण्यांचा वापर करत असत?

-पूर्वीच्या काळी प्रवासासाठी घोडा हत्ती बैल गाढव या प्राण्यांचा सर वापर करतात

प्रश्न 6-चार पाच वाक्यात उत्तरे लिहा

24-रेल्वे कुठून कुठून कसा प्रवास करते हे तुझ्या शब्दात लिही

-रेल्वे धाड धाड खाड खाड आवाज करत राने वने खेडीपाडी तसेच डोंगरघाट यामधून शीळ वाजवत गाडी पुढे जाते.

पाठ-11

पिंकीची भेटवस्तू

प्रश्न-1- बहुपर्यायी प्रश्न-

1- कोणत्या दिवशी पिंकी ची शाळा अर्ध्या दिवसाची होती?

A.सोमवार B. मंगळवार C.शनिवार D. बुधवार

2. पिंकी चे खरे नाव काय होते?

A. सोनिया B. सीमा C. प्राजक्ता D. शामल

3. कोणाचा वाढदिवस होता?

A. पूजा B. सीमा C. रिया D. प्रेमा

4. पिंकीने जेवल्याबरोबर काय केले?

A. फिरायला गेली B.अभ्यासाला बसली C. गाणे म्हणत होती D.खेळात होती

5. पिंकी ने पूजा च्या वाढदिवसाला काय दिले?

A. वही B.पेन C. भेटकार्ड D.ड्रेस

6. पिंकी दुसऱ्यांना काय करत असे?

A. मदत B.त्रास C. चिडवत D. हट्ट

7. पिंकीची भेट कोणाला जास्त आवडली?

A. रिया B.रेशमा C.पूजा D. शामल

8. पिंकी चे कौतुक कोणी केले?

A. पूजाच्या आई-वडिलांनी B.शेजाऱ्यांनी C.मित्रांनी D. वडीलधाऱ्यांनी

9. पिंकी ने आतील पानावर काय लिहिले होते?

A. पूजा छान आहेस B.पूजा तू वाईट आहेस. C. पूजा वाढदिवसाच्या शुभेच्छा. D.पूजा प्रेम

10. पूजाला भेट कार्ड देऊन पिंकीने काय मिळवले?

A. पैसा. B.सोने. C.आनंद. D. त्रास

प्रश्न-2- रिकाम्या जागा भरा-

11. पिंकी चे खरे नाव.......... होते.

12........... असल्यामुळे पिंकी अर्ध्या दिवसाची शाळा संपून घरी आली.

13. सर्वजण लाडाने.......... म्हणत.

14. पिंकीने सुंदर.......... तयार केले

15. पिंकी ची भेट ....ला आवडली

प्रश्न-3- खालील शब्द समूहास एक शब्द लिहा-

17. जिलेबी ,लाडू , पेढा ,म्हैसूर पाक

18. गंगा , यमुना. , कृष्णा , कावेरी

19. जोंधळा ,गहू ,तांदूळ , नाचना

20. बेळगाव, बिदर , धारवाड , कारवार

21. शर्ट ,पॅन्ट , कोट ,जॅकेट

प्रश्न-4- खालील प्रश्नांची उत्तरे लिहा-

22. पिंकी चे खरे नाव कोणते?

23. पिंकीने केलेल्या वस्तूंची नावे लिहा?

24. पिंकीने भेट कार्ड का तयार केले?

25. तू तुझ्या मैत्रिणीच्या / मित्राच्या वाढदिवसाला काय करशील?

26. सुट्टीच्या दिवशी तू कोण कोणती कामे करतोस?

27. तू आईला कोण कोणत्या कामात मदत करतोस/ करतेस?

पाठ 12

✸दासवाणी✸

प्रश्न 1 खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा

1-वाट चालतांना कोणती खबरदारी घ्यावी?

2-कोणते फळ खाऊ नये?

3-पटकन कोणती वस्तु घेऊ नये?

4-सुख कशात मानू नये?

5-कोणाचा उपकार घेतला तरी पुढे काय करावे?

6-पुसणे म्हणजे काय?

7-दासवाणी कोणी लिहिली?

8-कार्य करतांना कसे करावे?

9-कोणते मनात आणू नये?

10-परपीडा म्हणजे काय?

प्रश्न II नमुन्या प्रमाणे तयार कर

नमूना पर-सुख =परसुख

11--दु:ख -------------------

12--ग्रह-------------------

13–लोक----------------

14–निंदा-----------------

प्रश्न III नमुन्या प्रमाणे तयार कर

नमूना जसे घेऊ ----घेऊ नये

15-घेऊ

16-देऊ

17-करू

18-जाऊ

प्रश्न IV कवितेत विण लागून तयार झालेले शब्द शोध

जसे---- पुसल्यावीण

19--

20--

प्रश्न V खालील कवितेच्या ओळी पूर्ण कर

21-कोणाचा उपकार -------------

---------------------तरी राखों नये

22-आळसे सुख-------------------

--------------------------कार्य कांही

23-या कवितेत नये हा शब्द किती वेळा आलेला आहे ते शोधून लिही

24-नवीन शब्दांचे अर्थ लिहून काढ

25-तुझ्या हस्ताक्षरात कवीता लिही

26-कवीता चालीत म्हण

27-मनाचे श्लोक मिळवून वाच

28-समर्थ रामदास महाराजांसारखे आणखी दोन संतांची नांवे सांग

प्रश्न VI-विरुद्ध अर्थाचे शब्द लिही

29-सुख

30-निंदा

पाठ 13 वा

✹प्रामाणिकतेचे फळ✹

सामर्थ्य /अध्ययन निष्पत्ती :-

प्रश्न 1 ला रिकाम्या जागा भरा .

1) साहेबांनी तिचे ——-,-----विचारून घेतले .
2) —-----वेळ असल्याने सर्व विद्यार्थी शिक्षक एकत्र जमले होते .
3) वैशालीने साहेबांचे पैसे--------- ठेवून दिले .
4) नेहमीप्रमाणे वैशाली-------- येथे उभी होती.
5) साहेबांनी ——-----व ——-दैनिक विकत घेतले.

प्रश्न 2 रा खालील प्रश्नांची दोन वाक्यात उत्तरे लिहा

6) वैशालीचे कोणी अभिनंदन केले ?
7) दिवसभर वैशालीचे मन का रमले नाही .?
8) साहेबांनी वैशाली बद्दल पूर्ण माहिती कोणाकडून जाणून घेतली .?
9) वैशालीच्या पुढील शिक्षणाची सर्व जबाबदारी कोणी स्वीकारली.?
10)“मेहनतीचेच खावे “ असे कोण म्हटले.?

प्रश्न 3 रा पर्यायी उत्तर शोधा

11) वैशालीला साहेबांची गाडी कोठे दिसली. ?

1)ऑफिस समोर 2) बस स्टॅन्ड 3) रेल्वे स्टेशन 4) औषध दुकान समोर

12) साहेबांनी वैशाली कडून काय विकत घेतले.?

1)पेन2) रुमाल 3)दैनिक 4) पुस्तक

3) वैशाली कोणत्या इयत्तेत शिकत होती?

